# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**विशेष महासभा दि. १२/११/२०१०**

आज शुक्रवार दि. १२/११/२०१० रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०७ दि. ०२/११/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| ३) | नलावडे दिनेश दगडू | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील प्रभात प्रकाश | सभागृह नेता |
| ५) | पाटील मिलन गोविंदराव | विरोधी पक्षनेता |
| ६) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ७) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ८) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ९) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १०) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| ११) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १२) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १३) | पाटील जयंत महादेव | सदस्य |
| १४) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १५) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| १६) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| १७) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १८) | पाटील शरद केशव | सदस्य |
| १९) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २०) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २१) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २२) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| २३) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| २४) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| २५) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| २६) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| २७) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| २८) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| २९) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३०) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३१) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३२) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३३) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ३४) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ३५) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ३६) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ३७) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ३८) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ३९) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ४०) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ४१) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४२) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ४३) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ४४) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ४५) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ४६) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ४७) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ४८) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ४९) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ५०) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ५१) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ५२) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ५३) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ५४) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ५५) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ५६) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ५७) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ५८) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५९) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ६०) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ६१) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ६२) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| २) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ३) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ४) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ५) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ६) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ७) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ८) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ९) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| १०) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ११) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| १२) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| १३) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| १४) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| १५) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| १६) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |
| १७) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| १८) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज – निरंक**

| | | |
|---|---|---|
| १) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| २) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विशेष मा. महासभा शुक्रवार दि. १२/११/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०७, दि. ०२/११/२०१० रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ६०, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन

(सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे. सर्व गटनेत्यांनी दिलेल्या कोटयाप्रमाणे नावे दयायची आहेत.

**जयंत पाटील :-**

आज लोकसत्तेला बातमी महत्वाची आलेली आहे त्यामुळे शहरातील सर्व लोक हादरलेली आहेत. या शहरातील पाणीपुरवठा योजना आहे. सुर्या प्रकल्पातील ती रद्द झाली अशी खूप मोठी बातमी आहे. त्या संबंधी सविस्तर चर्चा साहेब आम्हाला माहिती सांगतील.

**नगरसचिव :-**

चर्चा आज करता येणार नाही.

**जयंत पाटील :-**

साहेब, माहिती द्यायला हरकत काय आहे. पाण्यासारख्या सेन्सेटीव्ह प्रश्नावर विषय आहे.

**नगरसचिव :-**

पूर्ण होऊ द्या.

**प्रभात पाटील :-**

नाही नाही, कशाला पूर्ण होऊ द्या. पूर्ण झालं आणि नाही झाली तरी माहिती देणार आहेत ना. हा जीवन मरणाचा प्रश्न आहे. तुम्ही हया विषयावर माहिती दया. त्यांना माहिती देऊ द्या.

**जयंत पाटील :-**

मॅडम, त्यात सरळ असं लिहीलेलं आहे, बातमीमध्ये असे आहे की, ते पाणी सिंचनासाठी आहे. पिण्यासाठी नाही असं त्या बातमी मध्ये आहे. त्यामुळे ती योजना बारगळण्याची शक्यता आहे. त्या वर्तमानपत्रात बातमी आहे. आणि साहेब, तुमचं स्टेटमेंट आहे त्यामध्ये नक्की काय आहे?

**प्रभात पाटील :-**

देऊ देना साहेब मिटींगला होते त्यादिवशी.

**जयंत पाटील :-**

आम्हाला ही धावपळ करता येईल ना राजकीयदृष्टया.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, मिरा भाईंदर आणि वसई-विरार पाणी पुरवठा योजना अडचणीत असं जे हेडलाईन देऊन जी बातमी आलेली आहे ही बातमी येण्यापूर्वी मा. अजितदादा पवार साहेबांनी मिटींग घेऊन १०० एम एल डी मंजूर केलेली आहे. आणि हया मिटींगला महापौर साहेब आणि काही पदाधिकारीही आमच्या बरोबर होते. त्यांनी मंजूर करुन दिल्यानंतर एम.एम.आर.डी. ने १०० एम.एल.डी. त्यांचे स्वतःचे इन्क्लूड करुन केंद्र शासनाकडे योजना पाठवली. १०० एम.एल.डी. शासनाने मंजूर केलेले मिनिट्स आणि एम.एम.आर.डी ला ९६ कोटी शासनाला भरल्यामुळे त्यांना ३०२ एम.एल.डी. मिळायला पाहिजे होतं. त्यांना १०९ एम.एल.डी. मिळाली. त्यामधून १०० एम.एल.डी. मिरा भाईंदर साठी देतो असं डी.पी.आर.एम.एम.आर.डी ने सही करुन केंद्र शासनाला पाठवले. केंद्र शासनाकडुन परत आलेलं आहे की, महाराष्ट्रासाठी फंड जे प्रोव्हिजन होतं ते संपलेलं असल्यामुळे देता येणार नाही. गव्हर्नमेंटने जे नाकारलं. फंड महाराष्ट्राने जे जास्त उचललं आहे त्यामुळे ही योजना परत केली आणि त्यानंतर सेक्रेटरी साहेबांकडे मिटींग होऊन पी.पी. तत्वावर योजना राबवावी. असा निर्णय झाल्यानंतर महासभेच्या मंजूरीने ते करतो. त्यामुळे उच्च अधिकार समितीने १०० एम.एल.डी. मिरा भाईंदरसाठी मंजूर केलेली आहे आणि एम.एम.आर.डी. ने १०० एम.एल.डी. दिलेली आहे. त्यांचा वाद ३०२ एम.एल.डी. मिळायला पाहिजे असे एम.एम.आर.डी ने गव्हर्नमेंटला लिहिलेले आहे त्याचं उत्तर हे आहे ३०२ एम.एल.डी. करीता ९६ कोटी भरलेल्या बदल्यात ३०२ मिळावे अशी त्यांची मागणी आहे.

**जयंत पाटील :-**

बातमी मध्ये असं आहे की, ते पाणी सिंचनासाठी आहे. पिण्यासाठी नाही अशी बातमी आहे.

**मा. आयुक्त :-**

तेच तुम्हाला सांगतो. पिण्यासाठी एम.एम.आर.डी ने.......

**जयंत पाटील :-**

तुम्ही जे म्हणता ते अगदी विषयांत बोलता का? त्या बातमीला तुम्ही विरोध करताय?

**मा. आयुक्त :-**

बातमी मध्ये काय झालेलं आहे. बातमी जी बांधकाम केली आहे ते एरीगेशन साठी केले आहे. आणि ९६ कोटी जे फॉरेस्ट कडे भरले आणि वाढीव एम.एल.डी. मिळणार आहे. त्यामधले आम्हाला मिळालेले आहे. म्हणजे एरिगेशनचा कोटा शिल्लकच राहिला. ३०२ एम.एल.डी. एम.एम.आर.डी.ला मिळालेले आहे हे पिण्यासाठी त्यांनी भरलेले आहे. एम.एम.आर.डी ने

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, सिंचनाचे पाणी पिण्यासाठी वापरु नये म्हणून पी.आय.एल. दाखल झालेला आहे हायकोर्टामध्ये.

**मा. आयुक्त :-**

हायकोर्टात दाखल झालेला आहे म्हणूनच त्याची धरणाची उंची वाढवली कॅसमेट एरिया वाढवली त्यासाठी एम.एम.आर.डी. ने ९६ कोटी भरले. तो जो वाढीव साठा आहे. तो पिण्यासाठी वापरण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. ने मागणी केली, त्यामधून आम्हाला मिळालेली आहे. सेंट्रल गव्हर्नमेंटकडे ही योजना गेली होती सगळयांच्या सहीने उद्‌भव असल्याशिवाय योजना जात नाही.

**प्रभात पाटील :-**

याबाबत मला असं म्हणायचयं की, ती बातमी जी आहे ती काहीतरी वेगळं सांगतेय. आपलं म्हणणं काय मी आणखी दोन वृत्तपत्र वाचले. त्याच्यामध्ये लोकांच्या तोडचं पाणी पळणार अशी बातमी आहे. आपण स्पष्टीकरण कराव ना. आपण आयुक्त आणि महापौर साहेब पेपरचे स्पष्टीकरण द्यावं. त्यामुळे नागरीकांमध्ये हालचाल आहे शहरामध्ये तुम्ही त्या गोष्टीचं स्पष्टीकरण करावे.

**नगरसचिव :-**

वृक्षप्राधिकरणासाठी आलेली नावं मी घोषित करतो.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, त्यावेळी अपक्षाचा पाठिंबा राष्ट्रवादी पक्षाला होता त्यावेळी एकत्र करुन वर्षा भानुशाली यांचं नाव गेलं होतं. त्यावेळी हा गट वेगळा झाला. स्टँडींग सदस्य पण वेगळ गेलं. पण हा गट आता वेगळा पडला हे व्हायला पाहिजे ना?

**नगरसचिव :-**

कोटयात बसायला पाहिजे ना. त्यांच्या कोटयात होत ते.

**नरेंद्र मेहता :-**

किती पॉईंट किती रेशो होता? टोटल १४ सदस्य ना.

**नगरसचिव :-**

तेरा

**नरेंद्र मेहता :-**

तेरा आणि एक बाहेरून, टोटल करुन दाखवा ना.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, तुमच्या हिशोबाने किती जातात. कॉंग्रेसचे किती जाणार

**नगरसचिव :-**

कॉंग्रेसचे सहा

**नरेंद्र मेहता :-**

तेरामधून सहा आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस

**नगरसचिव :-**

राष्ट्रवादी कॉंग्रेस चार

**नरेंद्र मेहता :-**

भाजप

**नगरसचिव :-**

भाजप दोन

**नरेंद्र मेहता :-**

सेना, एक

**नगरसचिव :-**

एक

**नरेंद्र मेहता :-**

एन.सी.पी. चे किती टोटल परसेंटेज काढले तर एकाला ५.४८ टक्के. सचिव साहेब लोकशाही आघाडीची संख्या किती?

**नगरसचिव :-**

३३

**नरेंद्र मेहता :-**

३३ कॉंग्रेसची आहे.

**नगरसचिव :-**

३९ (एकोणचाळीस), ३९ ला ६.३३ टक्के आले.

**नरेंद्र मेहता :-**

७९ डिवाईड केले ना.

**नगरसचिव :-**

७८ ने केले.

**नरेंद्र मेहता :-**

संध्या पाटील जे नविन सदस्य आलेत त्यांना मोजणार नाही.

**नगरसचिव :-**

ते त्यादिवशी नव्हते. आपला २ तारखेचा अजेंडा होता. २ तारखेला त्यांच गॅझेट नव्हत.

**नरेंद्र मेहता :-**

बर. किती आला ६.३३ त्या हिशोबान नाही बसत

**नगरसचिव :-**

बसत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्हाला खात्री आहे ना.

**नगरसचिव :-**

हो खात्री आहे १) श्रीम. शानु गोहिल २) श्रीम. सुनिता भोईर ३) श्रीम. नयना गजानन म्हात्रे ४) श्री. अनिल दिवाकर सावंत ५) श्री. प्रमोद सामंत ६) श्रीम. सरीता म्हात्रे ७) सौ. अनिता पाटील ८) श्रीम. वंदना चक्रे ९) श्री. टेरी परेरा १०) श्री. प्रकाश दुबोले ११) श्री. पाटील शरद केशव १२) श्री. संजय पांगे १३) श्री. अनंत रामचंद्र पाटील १४) श्री. महेंद्रसिंग चौहाण असे चौदा सदस्य झालेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

बीजेपी चे परत सांगा.

**नगरसचिव :-**

शरद पाटील आणि संजय पांगे, सेना- अनंत पाटील

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब थोडी माझी, एखादे वेळेस गैरसमज असेल एन.सी.पी ची लोकसंख्या टोटल २१, ६.३३ आपण केलं इन टू तीन केलं तर १९ त्याला त्यांचे क्लीअर जातात. १९ पॉईंन्टस् समथिंग मग दोन उरतात, अपक्षाचे तीन उरतात, मग तीनला जायला पाहिजे.

**नगरसचिव :-**

पॉईंट दोघांचे सारखे असल्यानंतर......

**नरेंद्र मेहता :-**

सारखे नाही

**नगरसचिव :-**

४९-४९ पॉईंट ४९ काढले ना. अपक्षाचे ३ आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब तसं नाही ना. ६.३३ इन टू तीन त्यांची क्लिअर जाईल ते होणार १८.९९

**नगरसचिव :-**

नाही गणित असं करा एकूण पक्षाचे सदस्य भागिले सदस्य संख्या गुणिले निवडायची सदस्य संख्या

**नरेंद्र मेहता :-**

केलं तर नाही होत ना.

**नगरसचिव :-**

तुमचे तीन आहेत ना. तीनला मी काढून दाखवतो. तीन भागिले ७८ गुणिले १३.४९ तीन अपक्ष सदस्य आहेत त्यांना ०.४९ येते.

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे आता राष्ट्रवादीचे तीन काढून.......

**नगरसचिव :-**

२१ आहेत त्यांना, ३.४९ येतात.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब ह्यामध्ये अजूनही कन्फयुजन आहे तरी आपल्याला अशी विनंती आहे की, हे आपण प्रोसिडींगमध्ये नोंदवून घ्या की हयात काही फरक आला आणि ते कॅल्क्युलेशन बरोबर झालं तर आम्हाला परत संधी देण्यात यावी.

**नगरसचिव :-**

शेवटी सभागृहाचा निर्णय असतो.

**नरेंद्र मेहता :-**

इक्वल झाला तर सभागृहाचा निर्णय माहित आहे. पण माझ्या माहितीप्रमाणे इक्वल होत नाही. माझ्याकडे टोटल कॅल्क्यूलेशन नाही आमचं गणित असं होत की अपक्ष स्टँडींग प्रमाणे जायला पाहिजे त्या तयारीने आम्ही आलेलो पण एखादा जरी आपल्याला वाटलं असेल नाही जात. आम्ही तुम्ही जे टोटल केल आहे त्याला स्विकारुन पण त्यामध्ये काही दुरुस्ती असली तर मग सुधारणा करुन घ्या.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब, यहाँ पे, व्यासपीठ मे आप निर्णय लेनेवाले अधिकारी है। आपके कॅल्क्युलेशन करके राष्ट्रवादी, कॉग्रेस पार्टी का पहिले २१ के हिसाब से ३.४९ होता है। और ३.४९ होने के कारण चार सदस्य पहिले राष्ट्रवादी पक्ष के जाते है। आपसका ४९ होने के कारण उसका जिरो होता है। ये निर्णय ये सदन के अंदर आपके माध्यमके बाद होने मे कोई बात किंतू परंतु रहती नही है। नही उसपे फेरविचार हो सकता है। जिसको जाता है मंत्रालय, सचिवालय कोर्ट कचेरी मे कही भी जाए खतम।

**नरेंद्र मेहता :-**

पिठासीन अधिकारी साहेब, आमचं म्हणणं सचिवांबद्दल नाही. एखादं कॅल्क्युलेशनमध्ये फरक झाला तर मी बोलतो, फरक झाला तरच आम्ही बोलतोय बाकी आम्ही बोलतच नाही.

**मा. महापौर :-**

सभागृहाने निर्णय घेतला आणि एकदा निर्णय झाला तर बदल करता येत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

टोटल मध्ये शंका असेल तर.......

**मा. महापौर :-**

टोटल मध्ये शंका येण्याच कारणच नाही ना. अहो आमचे पण सदस्य आहेत आम्ही पण अभ्यास करुन बसलो आहे.

**एस. ए. खान :-**

महापौर साहेब, घोषणा करा ना लवकर.

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त साहेब जसं सचिव साहेब सांगतात ६.३३ ला एक सदस्य जातो. आता तीन सदस्य एनसीपी पक्षाचे जातात ते होतात. १८.९९ त्यांचे उरलेले सदस्य आहेत ते २.०१ आणि इकडे अपक्ष ३ क्लिअर आहेत.

**नगरसचिव :-**

वृक्षप्राधिकरण समितीची नाव मा. महापौरांच्या आदेशाने घोषित केलेली आहेत. स्विकृत सदस्य महेंद्रसिंग चौहान १) श्रीम. शानु गोहिल २) श्रीम. सुनिता भोईर ३) श्रीम. नयना गजानन म्हात्रे ४) श्री. अनिल दिवाकर सावंत ५) श्री. प्रमोद सामंत ६) श्रीम. सरीता म्हात्रे ७) सौ. अनिता पाटील ८) श्रीम. वंदना चक्रे ९) श्री. टेरी परेरा १०) श्री. प्रकाश दुबोले ११) श्री. पाटील शरद केशव १२) श्री. संजय पांगे १३) श्री. अनंत रामचंद्र पाटील तेरा सदस्य आणि एक स्विकृत सदस्य असे १४ आणि मा. आयुक्त या समितीचे अध्यक्ष असतील असे १५ सदस्यांची समिती गठित झालेली महापौरांच्या आदेशाने घोषित करतो. कालावधी १ वर्षासाठी असेल.

**प्रकरण क्र. ६० :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**ठराव क्र. ५८ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरविता येईल अशारितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्त १५ व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मा. महासभा दि. १७/१०/२००७ ठराव क्र. ६ अन्वये वृक्षप्राधिकरण समिती गठित करण्यात आलेली होती. त्यामध्ये एकूण सदस्य संख्या १५ असावी असे ठरविण्यात आले आहे. कलम ३(१) व ३(३) अन्वये १५ सदस्यांमध्ये एक विशेष अनुभव ज्ञान असणाऱ्या बिन सरकारी संघटनेचा प्रतिनिधी मधून नामनिर्देशित केलेला असेल व एक सदस्य हा या समितीचा अध्यक्ष असेल. कलम ३(२) अन्वये या समितीचे अध्यक्ष हे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त असतील.

यापूर्वी वृक्ष प्राधिकरण समितीवर तौलानिक संख्याबळानुसार संयुक्त लोकशाही आघाडी ६+१ नामनिर्देशित सदस्य, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ४, भारतीय जनता पार्टी २ व शिवसेना १ अशी सदस्य नेमणूक केलेली होती.

मा. उपसचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवी-२८, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या जागी त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य वृक्ष प्राधिकरण समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

त्यानुसार वृक्षप्राधिकरण समितीवर खालील सदस्यांची एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्रीम. शानु गोहिल | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | श्रीम. सुनिता भोईर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | श्रीम. नयना गजानन म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | श्री. अनिल दिवाकर सावंत | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ५. | श्री. प्रमोद सामंत | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ६. | श्रीम. सरीता म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ७. | सौ. अनिता पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ८. | श्रीम. वंदना चक्रे | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ९. | श्री. टेरी परेरा | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १०. | श्री. प्रकाश दुबोले | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ११. | श्री. पाटील शरद केशव | भारतीय जनता पक्ष |
| १२. | श्री. संजय पांगे | भारतीय जनता पक्ष |
| १३. | श्री. अनंत रामचंद्र पाटील | शिवसेना |
| १४ | श्री. महेंद्रसिंग चौहाण | नामनिर्देशित सदस्य |

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर तथा पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नवीन आठ (८) सदस्यांच्या नेमणूकीकरिता तसेच स्थायी समितीच्या तीन सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये तीन (३) सदस्याची नेमणूक करणे.

निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे :-

१) श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो २) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
३) श्री. याकुब ईस्माईल कुरेशी ४) श्री. अनिल दिवाकर सावंत
५) श्री. जुबेर अब्दुल्ला इनामदार ६) श्री. मदन उदितनारायण सिंह
७) श्री. शरद केशव पाटील ८) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील

राजीनामा दिलेल्या सदस्यांची नावे

१) श्रीम. अनिता जयवंत पाटील २) श्री. बर्नड अल्बर्ट डिमेलो ३) श्रीम. वर्षा गिरीधर भानुशाली गटनेत्यांनी नांवे द्यायची आहेत आणि जे निवृत्त झालेले आहेत त्या जागी येणारे सदस्य उर्वरीत कालावधीसाठीच रहातील. राजीनामा दिलेले सदस्य आहेत त्यांच्या जागी येणारे सदस्य उर्वरीत कालावधीसाठीच रहातील. गटनेत्यांनी नावे दयावीत.

**महापौरांच्या परवानगीने आलेली नावे वाचून दाखवतोय** १) श्री. शशिकांत भोईर २) श्री. लक्ष्मण जंगम ३) श्रीम. मुसरर्तबानु शेख ४) श्री. स्टिवन जॉन मेन्डोंसा ५) श्री. भगवती शर्मा ६) श्री. दुबे रामनारायण सदानंद ७) श्रीम. स्नेहा शैलेश पांडे ८) श्री. मोहन गोपाळ म्हात्रे ९) सौ. कॅटलीन परेरा १०) श्री. राजेश म्हात्रे ११) श्री. जाधव मोहन

निवृत्त झालेल्या ठिकाणी ८ आणि राजीनामा दिलेल्या ठिकाणी ३ नावे आलेली आहेत अशी एकूण ११ नांवे आलेली आहेत ती वाचून दाखवली. निवृत्त झालेल्या सदस्यांचा ठिकाणी येणाऱ्या नवीन सदस्यांचा कालावधी २ वर्षाचा असेल आणि राजीनामा दिलेल्या जागी आलेल्या सदस्यांचा कालावधी उर्वरीत कालावधीसाठी असेल. राजीनामा दिलेल्या ठिकाणी उर्वरीत कालावधी एक वर्षाचा असेल तसेच अपक्ष निवृत्त झालेल्या ठिकाणी श्री. मोहन जाधव यांचे नाव आलेले आहे. त्यांचा देखील कालावधी उर्वरीत कालावधी असेल अशी एकूण आठ आणि तीन अकरा नावं आलेली आहेत. राजीनामा दिलेल्या ठिकाणी ३ लोकांची नांव आहेत. आणि ८ निवृत्तच्या ठिकाणी आहेत अशी अकरा नाव दिलेली आहेत.

**मा. महापौर :-**

आता वाचलेली नाव स्टॅंडीगसाठी ही सर्व मंजूर करण्यात आलेली आहेत.

**प्रकरण क्र. ६१ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नवीन आठ (८) सदस्यांच्या नेमणूकीकरिता तसेच स्थायी समितीच्या तीन सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये तीन (३) सदस्याची नेमणूक करणे.

निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे :-

२) श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो  २) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
३) श्री. याकुब ईस्माईल कुरेशी  ४) श्री. अनिल दिवाकर सावंत
५) श्री. जुबेर अब्दुल्ला इनामदार  ६) श्री. मदन उदितनारायण सिंह
७) श्री. शरद केशव पाटील  ८) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील

राजीनामा दिलेल्या सदस्यांची नावे

१) श्रीम. अनिता जयवंत पाटील २) श्री. बर्नड अल्बर्ट डिमेलो ३) श्रीम. वर्षा गिरीधर भानुशाली

**ठराव क्र. ५९ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीवरील सदयांपैकी निम्मे आठ सदस्य माहे ऑक्टोबर २०१० च्या पहिल्या तारखेस निवृत्त झालेले आहेत. तसेच तीन सदस्यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे.

निम्मे आठ सदस्य निवृत्त करताना संयुक्त लोकशाही आघाडीचे ३, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी २, भारतीय जनता पक्षाचे २ व शिवसेना १ असे एकुण आठ सदस्य निवृत्त होणार आहेत. तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या २ व अपक्ष १ अशा एकुण तीन सदस्यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे. मा. उपसचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवी-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ व राजिनामा दिलेल्या तीन सदस्यांच्या जागी त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नविन आठ सदस्यांची नेमणूकीसाठी तसेच स्थायी समितीच्या तीन (३) सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये तीन (३) सदस्यांची उर्वरीत कालावधीसाठी नेमणूक करणेस शिफारस आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. शशिकांत भोईर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | श्री. लक्ष्मण जंगम | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | श्रीम. मुसरर्तबानु शेख | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | श्री. स्टिवन जॉन मेन्डोंसा | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी |
| ५. | श्री. भगवती शर्मा | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी |
| ६. | श्री. दुबे रामनारायण सदानंद | भारतीय जनता पक्ष |
| ७. | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | भारतीय जनता पक्ष |
| ८. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | शिवसेना |

राजीनामा दिलेल्या तीन सदस्यांच्या जागी उर्वरीत कालावधीसाठी खालील प्रमाणे सदस्यांची नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | सौ. कॅटलीन परेरा | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी |
| २. | श्री. राजेश म्हात्रे | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी |
| ३. | श्री. जाधव मोहन | अपक्ष |

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर तथा पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. नगरसेवक / नगरसेविका, पत्रकार बंधु, प्रेक्षक गॅलेरीतील प्रेक्षक, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची ही सभा संपल्याचे जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**